# रे.मु.नं. २८/२०१४ मधील नि.४५ वरील आदेश

( घोषित ता.१७.०८.२०१७ )

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दावा दुरूस्त होवून मिळणेसाठी केला आहे.

२. वादींनी सदरचा दावा हा ठरावाकरीता व वाटपाकरीता आणि हिस्सा निरतुटक करुन मिळणेसाठी केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्र.वादी हे दाव्यात हजर होवुन मे. कोर्टापुढे कैफियत दाखल केलेली आहे. वादीनी देखिल पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदरचे दाव्यामध्ये नजर चुकीने काही प्रतिवादींना व काही मिळकती दाव्यात सामिळ करण्याचे राहुन गेलेले आहेत. त्याचा विचार करता सदरचा दावा दुरुस्तीचा विचार करणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या वस्तुस्थितीचा खुलासा वादीस दाव्यात करणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्या अनुषंगाने दुरूस्ती करणेही न्यायाचे दृष्टीने जरूरी आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात अगर प्रतिवादीच्या प्रतिकथनामध्ये काहीही बदल होत नाही. सबब वादीस दावा दुरूस्त करण्यास परवानगी मिळावी.

३ दाव्याचे अनेकीकरण टाळावे म्हणून त्याबाबतच्या वस्तुस्थितीचा खुलासा वादीस दाव्यात करणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्या अनुषंगाने दुरूस्ती करणेही न्यायाचे दृष्टीने जरूरी आहे.

४ प्र.वादी क्र. १ ते ५ तर्फे म्हणणे देवून अर्जात त्यांचेविरुध्द कथन केलेला सर्व मजकूर नाकारला आहे. प्र.वादी क्र. ६ ते १५ यांनी म्हणणे देवुन सदर दावा दुरुस्ती करण्यास हरकत नाही.

५ हे प्रस्थापित आहे की, हुकूम ६ नियम १७ चा मुख्य उद्देश दाव्यातील पक्षकारांना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार

दुरूस्त करण्याची संधी देणे असा आहे. दुरूस्ती मागण्यासाठी विलंब झाला म्हणून ती दुरूस्ती नामंजूर करता येत नाही. न्यायाचे हेतूसिध्दीसाठी दाव्यामध्ये कधीही दुरूस्ती करण्याची मुभा देण्याचा न्यायालयास अधिकार आहे. दुस-या बाजूला अपरिमित नुकसान होत नसेल किंवा त्याच्यांवर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयाला मुभा आहे, विरूध्द बाजूचे जर काही अपरिमित नुकसान होत असेल किंवा त्याच्यावर गंभीर अन्याय होत असेल, तर न्यायालयाला कथनांमधील दुरूस्ती मान्य करण्याची मुभा नाही. जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात काही बदल होणार नसेल, तर दावा दुरूस्ती मान्य करणेत यावी, असे करत असतांना योग्य असेल तर न्यायालयाने विरूध्द पक्षकारांस पुरेशी भरपाई देणे बाबत विचार करावा. तसेच दाव्याचे अनेकीकरण टाळून वादी व प्र.वादी यांच्यातील दाव्याची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीनेही दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित असते. अर्ज केल्या तारखेच्या दिवशी जर दावा मुदती बाहेर जात असेल तर सर्वसाधारणपणे, नियमाप्रमाणे न्यायालय नि:संशय दुरूस्तीचा अर्ज मान्य करणे नाकारतात. पण हा मुद्दा पुर्णपणे न्यायलयाच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असतो. हे करतांना न्यायालयाच्या अधिकाराचा गैरवापर केला जात नाही ना हे पाहिले जाते. दावा प्रलंबित असतांना जे मागावून झालेले बदल आहेत त्याकरिता दावा दुरूस्ती करू देणे हे न्यायाचे दृष्टीने योग्य ठरते. थोडक्यात, न्यायाच्या दृष्टीने योग्य असेल तेंव्हाच दुरूस्ती मान्य केली जाते.

६ वादीने प्रस्तुतचा अर्ज देवुन त्याच्या दाव्यामध्ये जी दुरूस्ती मागीतली आहे त्याचा विचार करता हे स्पष्ट होते की, वादीचे कथनाप्रमाणे त्यांनी प्रस्तुतचा दावा मालकी हक्काचा ठराव आणि वाटपासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदरची दुरुस्ती केल्याने वादी आणि प्र.वादी मध्ये वाद कायमस्वरुपी संपुष्टात येण्यासाठी आवश्यक आहे. माझे मताप्रमाणे वादीने प्रस्तुतचा दावा ठरावासाठी आणि वाटपाकरीता दाखल केलेला असल्याने तसा

खुलासा करून दावा दुरूस्त करून घेण्याचा वादीस पूर्णपणे कायदेशिर हक्क व अधिकार आहे. त्याबाबत प्रतिवादी यांना कसलाही आक्षेप घेता येणार नाही. त्यामुळे वादी मागतात तशी दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कसलेही नुकसान होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

७ दाव्याचे स्वरूप, आणि वादीने मागीतलेल्या प्रस्तावित दुरुस्तीचा साकल्याने विचार करता प्र.वादी क्र. १ ते ५ यांनी घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने दुरुस्तीच्या या अर्जातील कथनांच्या गुणावगुणाचा विचार करण्याचे अजिबात कारण नाही असे मला वाटते. त्यामुळेही प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे जरुर आहे.

८ जरी वादीचे मागणीप्रमाणे दुरुस्ती केलेस प्रतिवादी याला निश्चितच त्याच्या कैफियतीत त्यासंबंधी त्याचा बचाव मांडता येईल आणि त्यांना त्या अनुषंगाने पुरावाही देता येईल. त्यामुळे सदरची दुरुस्ती ही दाव्यात येणे आवश्यक आहे असे मला वाटते.

९ माझे मताप्रमाणे वादी मागित असलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मूळ दाव्यातील वादविषयाशी संबंधीतच आहे. दाव्याचे आणि वादीने मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती लक्षात घेता दुरुस्ती केल्याशिवाय सदरचा दावा अंतिम निर्णयाप्रत येऊ शकणार नाही. तसेच दाव्याचे अनेकीकरण चुकवून वादी व प्र. वादी यांचेतील दाव्यांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने सदरची दुरूस्ती करणे न्यायोचित ठरणार आहे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

१० तथापी वादीनी सदर दुरुस्तीचा अर्ज देण्यास ऐवढा विलंब का केला त्याचे संयुक्तीकरण त्यांनी दिलेले नाही. त्यामुळे प्र.वादी यास निष्कारण त्रास सोसावा लागले आहे. आणि दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. या सर्व

कारणाचा विचार करता प्र.वादी हे खर्च मिळण्यास पात्र आहे सदर खर्चाची रक्कम मी रुपये ८००/-इतकी निश्चित करीत आहे.

## आदेश

१ वादींचा नि.नं. ४५ चा दावा दुरूस्तीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२ वादीने सदर खर्चापोटी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना रक्कम रुपये ८००/-दि.**३१.०८.२०१७** रोजी किंवा तत्पुर्वी देणेची आहे. जर याप्रमाणे खर्चाची रककम दिली नाही. अथवा न्यायालयात जमा केली नाही. तर दुरुस्तीचा हुकूम आपोआप नामंजुर होईल.

३ वादीने दि. **३१.०८.२०१७** किंवा तत्पुर्वी दुरुस्त दाव्याची पत्र देणेची आहे. या निश्चित केलेल्या कालावधीत वादीने दाव्याची दुरुस्त पत्र दिले नाही. तर दुरुस्तीचा हुकूम आपोआप नामंजुर होईल.

४ प्रतिवादीस वादीच्या दावा दुरुस्तीच्या अनुषंगाने कैफियत दुरुस्ती करण्याचा हक्क राहील.

( खुले न्यायालयात अधिघोषित )

पेण ( एस.डी.मेहता),
दिनांक १७.०८.२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पेण